# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०९/०७/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावर मौजा जलालखेडा येथे दिनांक ०८/०८/२०२२ चे १९.१५ वा. दरम्यान आरोपी नामे– रुपेश गजानन चौरे रा. जलालखेडा. ता. नरखेडा यांची पत्नी सौ. सुवर्णा रुपेश चौरे हि एका वर्षापुर्वी फिर्यादी नामे– सौ. वर्षाबाई अनिलराव बढिये वय ३९ वर्ष रा. जलालखेडा.ता. नरखेड सोबत कामावर येत होती. यातील आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर आला व आवाज देवून बाहेर बोलाविल्याने फिर्यादी हि बाहेर आली असता आरोपीने फिर्यादीला म्हणाल की, 'तुनेच माझी बायको बाहेर पाठवली' असे म्हणून वादविवाद करुन शिवीगाळ करु लागला. तसेच आरोपीने फिर्यादीला ओढतान करुन थापडा मारल्याने फिर्यादी हि खाली पडल्याने डाव्या हाताला मार लागला. तसेच आरोपीजवळ असलेला चाकू मारण्याचा प्रयत्न करीत असतांना फिर्यादीचे पती अनिल बढिये हे मध्यस्थी येवून झगडाभांडण सोडविण्यास आले असता आरोपीने तो चाकू फिर्यादीचे पतीचे कमरेच्यावर मारुन जखमी केले. तसेच मोहल्यातील लोक झगडा सोडविण्यास आले असता आरोपीने तेथून पळ काढला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३२३, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री शेंडे हे करीत आहे.

### विनयभंग

**१) पो.स्टे. कन्हान** :– दिनांक ०८/०७/२०२२ चे १३.४५ वा. ते १३.५० वा. दरम्यान फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी/पीडिता वय ०९ वर्ष ही फिर्यादीच्या भासऱ्याच्या घरी भासऱ्याचा मुलासह जेवण करीत असतांनी तेथे नमुद आरोपी नामे– प्रकाश शंकररावजी पानतावने, वय ३० वर्ष, रा. राधाकृष्ण नगर वार्ड क्र. २ हनुमान मंदीरच्या समोर कन्हान हा येवुन वाईट उद्देशाने पीडित मुलीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यादरम्यान तो पळुन जात असतांना फिर्यादीने त्याला हटकले असता त्याने फिर्यादीला शिवीगाळ करून धक्काबुक्की करून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४ (अ), ३२३, ५०४ भादंवी. सहकलम ३(१)(w)(i)३(ii)(2)(va) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. सहकलम ४, ८, १०, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्री मुख्तार बागवान उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कामठी हे करीत आहे.

**२) पो.स्टे. जलालखेडा** :— दिनांक ०८/०७/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय १६ वर्ष हिची आरोपी नामे— मिलींद दिलीपराव ढोने वय २४ वर्ष रा. मेंढला ता. नरखेडा याच्या सोबत ०६ महिण्यापर्वी भेट झाली होती. तेव्हापासुन त्याला ओळखत असुन बोलचाल आहे. परंतु त्याचे वागने फिर्यादीला न पटल्यामुळे तिने १५ दिवसापासुन बोलने बंद केले होते. त्या अगोदर आरोपी मोबाईलवर बेलतांना 'तु माझशी लग्न कर' असे म्हणुन त्रास देत होता व लग्न केले नाहीतर जिवाचे बरेवाईट करेल असे बोलत होता. दि. ०८/०७/२२ रोजी फिर्यादी ०८.०० वा. दरम्यान कॉलेज मध्ये गेली व मोबाईलचे कामानिमीत्य भारसिंगी येथे १३.०० वा. दरम्यान मोबाईलचे दुकानात गेली असता आरोपीने तेथे येवुन तिचा फोन हिसकला तेव्हा फिर्यादी हि बाहेर निघाली असता तो तिचे मागे मागे आला. त्यानंतर फिर्यादी हि हॉटेल मध्ये बसली असता तेथे येवुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (ड) भादंवी. सहकलम १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अनिल जोशी मो.न ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**